# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)**

**Savitribai Phule Pune University**

**(formerly University of Pune)**

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम ४०(२)(ख)(एक)(दोन)(तीन) [40(2)(b)(i)(ii)(iii)] नुसार विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेमध्ये समाविष्ट असलेल्या अभ्यासमंडळावरील नामनिर्देशनांबाबत..**

## जाहिर प्रकटन

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम ४०(२)(ख)(एक)(दोन)(तीन) [40(2)(b)(i)(ii)(iii)] नुसार मा. कुलगुरु यांनी संबंधित अधिष्ठात्यांशी विचारविनिमय करुन किमान १० वर्षे अध्यापनाचा अनुभव असलेल्या पुढील प्रवर्गामधून एकूण सहा अध्यापक नामनिर्देशित करावयाचे आहेत.

४०(२)(ख)(एक) संबंधित विषयातील विद्यापीठ विभागाच्या पूर्णवेळ अध्यापकांमधून **एक अध्यापक;**

४०(२)(ख)(दोन) संबंधित विषयातील पदव्युत्तर अध्ययनक्रम देऊ करणा-या संलग्न महाविद्यालयांमधील किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थांमधील किंवा पदव्युत्तर केंद्रांमधील मान्यताप्राप्त पदव्युत्तर अध्यापकांमधून **दोन अध्यापक;**

४०(२)(ख)(तीन) संलग्न महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त परिसंस्था यांमधील विभागप्रमुख नसलेले **तीन अध्यापक.**

सदर तरतुदीनुसार, मा. कुलगुरु यांनी **विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेमध्ये समाविष्ट असलेल्या** खालील अभ्यासमंडळासमोर नमुद केलेल्या सदस्यांचे नामनिर्देशन केलेले असून ते पुढीलप्रमाणे आहे.

| अनु. क्रमांक | अभ्यासमंडळाचे नाव | म.सा.वि.अ., २०१६ मधील कलम | | नामनिर्देशित सदस्यांचे नाव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १. | बॉटनी | ४०(२)(ख)(एक) | १. | डॉ. मोकाट दिगंबर एन.<br>वनस्पतीशास्त्र विभाग,<br>सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे ४११००७ |
| | | ४०(२)(ख)(दोन) | १. | डॉ. घायळ निवेदिता ए.<br>आबासाहेब गरवारे महाविद्यालय,<br>कर्वे रोड, पुणे ४११००४ |
| | | | २. | डॉ. वरपे बाबासाहेब दादाभाऊ<br>एस.एस.जी.एम. सायन्स, गौतम आर्टस् ॲण्ड संजीवनी कॉमर्स कॉलेज,<br>ता. कोपरगाव, जि. अहमदनगर ४२३६०१ |
| | | ४०(२)(ख)(तीन) | १. | डॉ. ठाकुर हेमंतकुमार आत्माराम<br>एच.पी.टी. आर्टस्, आर.वाय.के. सायन्स कॉलेज,<br>प्रिन. टी.ए. कुलकर्णी विद्यानगर, नाशिक ४२२००५ |
| | | | २. | डॉ. सोनवणे हिरालाल<br>प्रा. रामकृष्ण मोरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आकुर्डी, पुणे ४११०४४ |
| | | | ३. | डॉ. खर्डे महेश निवृत्ती<br>प्रवरा रुरल एज्युकेशन सोसायटीचे पद्मश्री विखे पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,<br>लोणी खु., ता. राहाता, जि. अहमदनगर ४१३७१३ |

अभ्यासमंडळावरील नामनिर्देशित झालेल्या सर्व सदस्यांचे विद्यापीठातर्फे हार्दिक अभिनंदन.

यासंदर्भात आपणांस कळविण्यात येते की, उपरोक्त नमूद सदस्यांचे नामनिर्देशन हे, महाराष्ट्र शासन राजपत्र दि. २८ एप्रिल, २०१७ व त्यासंदर्भात शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेली परिपत्रके / पत्रे यांच्या अन्वये विद्यापीठाच्या कोणत्याही अधिकार मंडळावर नामनिर्देशित होण्यासाठी शासनाने विहीत केलेल्या पात्रता, शर्ती यांच्या अधिन राहून करण्यात येत असून उपरोक्त नमूद सदस्यांनी विद्यापीठाच्या परीक्षांशी संबंधित कामकाजाचे **एकूण किमान पाच वर्षे अनुभवाचे सोबत जोडलेल्या विहीत नमुन्यातील प्रमाणपत्र** निवडणूक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे **मंगळवार, दिनांक १६ मे, २०२३** पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करणे बंधनकारक आहे.

आपणांस यापुढे असेही कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम ४०(२)(ख) (एक)(दोन)(तीन)[40(2)(b)(i)(ii)(iii)] नुसार मा. कुलगुरु यांनी उपरोक्त नामनिर्देशित केलेल्या सर्व संबंधित व्यक्तींच्या सदस्यत्वाची मुदत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम ६२ मधील तरतूदीनुसार दिनांक ३१ ऑगस्ट, २०२७ पर्यंत राहिल व कलम ६३ आणि ६४ मधील तरतूद अथवा महाराष्ट्र शासनाकडून वेळोवेळी प्राप्त होणा-या आदेशास अधिन राहून यापैकी जे अगोदर घडेल त्या तारखेस संपुष्टात येईल, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

(डॉ. प्रफुल्ल पवार)
कुलसचिव

संदर्भ क्र. : साफुपुविनि/२०९
दिनांक : १३/०५/२०२३

<u>प्रत</u> **: सर्व नामनिर्देशित सदस्य.**

**प्रत माहितीसाठी :**

१) मा. कुलगुरु कार्यालय
२) मा. प्र-कुलगुरु कार्यालय
३) मा. कुलसचिव कार्यालय
४) मा. वित्त व लेखा अधिकारी
५) मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, परीक्षा विभाग
६) मा. विभागप्रमुख, संबंधित विभाग
७) मा. प्राचार्य, संबंधित महाविद्यालय
८) उपकुलसचिव, शैक्षणिक विभाग
९) उपकुलसचिव, सभा व दप्तर विभाग
१०) सहायक कुलसचिव, सर्वसाधारण विभाग

**<u>महाविद्यालयीन / परिसंस्थेतील अध्यापक यांचेकरिता</u>**

## <u>विद्यापीठाच्या परीक्षांशी संबंधित कामकाजाबाबतचे प्रमाणपत्र</u>

असे प्रमाणित करण्यात येते की, श्री./श्रीमती/डॉ. ...................................... यांनी या कार्यालयास उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रांवरुन त्यांना विद्यापीठाच्या परीक्षांशी संबंधित कामकाजाचा एकूण किमान पाच वर्षांचा अनुभव आहे.

पुढे असेही प्रमाणित करण्यात येते की, श्री./श्रीमती/डॉ. ......................................यांना महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम ६४ (ङ) मधील तरतुदीनुसार कोणत्याही परीक्षा घेताना व मुल्यमापन करताना, कोणत्याही प्रकारे व कोठेही अनुचित व्यवहार केल्याबद्दल किंवा त्याला चालना दिल्याबद्दल शिक्षा झालेली नाही.

सदरचे प्रमाणपत्र महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील विविध प्राधिकरणांवरील नामनिर्देशनाच्या कामी अधिसूचना दिनांक २९ एप्रिल, २०१७ च्या तरतूदीनुसार देण्यात येत आहे.

उपरोक्त तपशील कार्यालयीन माहितीनुसार अचूक आहे.

**स्वाक्षरी**

ठिकाण : **प्राचार्य / संचालक**

दिनांक : **महाविद्यालय / परिसंस्थेचे नाव व शिक्का**

**(टिप : सदरचे प्रमाणपत्र हे संबंधितांनी त्यांच्या संलग्न महाविद्यालयाच्या / मान्यताप्राप्त परिसंस्थेच्या लेटरहेडवर स्वाक्षरी व शिक्क्यानिशी दिनांकासह निर्गमित करावे.)**

**विद्यापीठ अध्यापक यांचेकरिता**

## विद्यापीठाच्या परीक्षांशी संबंधित कामकाजाबाबतचे प्रमाणपत्र

असे प्रमाणित करण्यात येते की, श्री./श्रीमती/डॉ. ...................................... यांनी या कार्यालयास उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रांवरुन त्यांना विद्यापीठाच्या परीक्षांशी संबंधित कामकाजाचा एकूण किमान पाच वर्षांचा अनुभव आहे.

पुढे असेही प्रमाणित करण्यात येते की, श्री./श्रीमती/डॉ. ......................................यांना महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम ६४ (ङ) मधील तरतुदीनुसार कोणत्याही परीक्षा घेताना व मुल्यमापन करताना, कोणत्याही प्रकारे व कोठेही अनुचित व्यवहार केल्याबद्दल किंवा त्याला चालना दिल्याबद्दल शिक्षा झालेली नाही.

सदरचे प्रमाणपत्र महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील विविध प्राधिकरणांवरील नामनिर्देशनाच्या कामी अधिसूचना दिनांक २९ एप्रिल, २०१७ च्या तरतूदीनुसार देण्यात येत आहे.

उपरोक्त तपशील कार्यालयीन माहितीनुसार अचूक आहे.

**स्वाक्षरी**

ठिकाण : **विद्यापीठ विभागप्रमुख**

दिनांक : **विद्यापीठ विभागाचे नाव व शिक्का**

**(टिप : सदरचे प्रमाणपत्र हे विद्यापीठाच्या लेटरहेडवर स्वाक्षरी व शिक्क्यानिशी दिनांकासह निर्गमित करावे.)**